**विशेष पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**दिनांक : ३१/१०/२०२२**

## पुसद ग्रामीण येथील खुनाचे गुन्हयातील दुसऱ्या आरोपीला अखेर हैद्राबाद येथुन केली अटक

दिनांक 27/10/2022 रोजी पो.स्टे. पुसद ग्रामीण हद्दीतील ग्राम वनवार्ला येथील अन्सार शेख मुसा वय 40 वर्षे, याचे खुन प्रकरणी दाखल अप.क्र. 627/2022 कलम 302,34 भादवि गुन्हयात मुख्य आरोपी 1) शेख मेहबुब शेख अजगर वय 20 वर्षे रा. वनवार्ला ता. पुसद यास गुन्हा घडल्यापासुन 24 तासाचे आत अटक करण्यात आली होती परंतु आरोपी क्र. 2) शेख नाजीर शेख अजगर वय 30 वर्षे, रा. वनवार्ला ता. पुसद हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता.

घटनेचे गांभीर्य पाहता आरोपीतांचा कसोशीने शोध घेवुन तात्काळ अटक करण्याबाबत मा.पोलीस अधीक्षक डॉ. श्री. पवन बन्सोड यांनी आदेशीत केले होते. त्यावरुन सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद श्री. पंकज अतुलकर यांनी गुन्हयाचे तपासावर लक्ष केंद्रीत करुन, रात्रीच नागपुर, आर्णी, पुसद, खंडाळा परिसरात पथक कार्यान्वीत करुन मुख्य आरोपीला भवानी नगर बांन्सी ता. पुसद येथील टेकडी परिसरातुन माहिती काढुन 24 तासाचे आत अटक करण्यात आली होती परंतु आरोपी क्र. 2) शेख नाजीर शेख अजगर वय 30 वर्षे, हा अटक टाळण्याकरीता लपुन छपुन वावरत असतांना त्याचे वास्तव्याची माहिती काढणे करीता त्याचे शोध कामी नेमलेल्या पथकांनी कसोशीने प्रयत्न करुन यवतमाळ, नागपुर, कळमनुरी परिसरात त्याचा कसोशीने शोध गोपणीय माहिती प्राप्त करुन त्यास अखेर हैद्राबाद येथुन ताब्यात घेवुन अटक केली. आरोपी शेख नाजीर शेख अजगर रा. वनवार्ला ता. पुसद यास मा. प्रथम श्रेणी न्यायालय पुसद यांनी दिनांक 03/11/2022 पावेतो पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदरची कार्यवाही मा. डॉ. पवन बन्सोड, पोलीस अधीक्षक, यवतमाळ, मा. डॉ. के. ए. धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ, मा. श्री. पंकज अतुलकर सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सपोनि गणेश इंगोले, पोहवा बालाजी ठाकरे, पोना गणेश बेंद्रे उपविपोअ कार्या. पुसद, पोहवा/मकसुद शेख, पोना/योगेश आळणे पो.स्टे. पुसद ग्रामीण यांनी पार पाडली

**(प्रदीप परदेशी)**
पो.नि.स्था.गु.शा.
पोलीस अधीक्षक यवतमाळ, करीता